32

महाराष्ट्र शासन

क्रमांक एनजीसी २०११/(१४५/११)/मशि-४
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-४०००३२
दि. १८ जून, २०१०

प्रति,
संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय: धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउद्देशिय संस्था, मेहकर, जि. बुलढाणा संचलीत कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर, जि. बुलढाणा या महाविद्यायातील विज्ञान शाखेचे सन २०११-१२ पासून नूतनीकरणास परवानगी मिळण्याबाबत

संदर्भ: १. शासनाचे पत्र क्र. एनजीसी ३५९६/नमवि/(४४६/९६)/मशि-३, दि. ११.१०.१९९६
२. सदर संस्थेचे वरील विषयाबाबतचे, दि. २८.१०. २०१० चे पत्र

महोदय,

संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने आपणांस असे कळविण्यात येते की, धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउद्देशिय संस्था, मेहकर, जि. बुलडाणा संचलीत कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर, जि. बुलढाणा या महाविद्यायास कला व विज्ञान विद्याशाखा शैक्षणिक वर्ष १९९६-९७ पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास मान्यता देण्यात आली होती. सदर महाविद्यालयाने सन १९९६-९७ पासून कला शाखा सुरु केलेली असून विज्ञान शाखा सुरु केलेली नाही. तरी या महाविद्यालयातील विज्ञान विद्याशाखेस महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८२ (५) मधील दुसऱ्या परंतुकातील तरतूदीनुसार कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यासाठी खालील अटीच्या अधिन राहून नुतणीकरणास परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर महाविद्यालयास भविष्यात शासनाकडून कोणतेही अर्थिक अनुदान मिळणार नाही. तसे हमीपत्र त्यांनी सहसंचालक, उच्च शिक्षण, यांचेकडे सादर करावे.
२. विभागीय सहसंचालकांचे वरील अ.क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे हमीपत्र सादर केल्याविषयीचे पत्र प्राप्त झाल्याशिवाय विद्यापीठांना संलग्नतेची प्रक्रिया सुरु करु नये.
३. विद्यापीठाने विहित केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार अध्यापक वर्ग / कर्मचारी वर्ग महाविद्यालयाने नेमणे आवश्यक असून इतर आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात.

(वि.गो.चांदेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
२. अध्यक्ष / सचिव, धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउद्देशिय संस्था, मेहकर, जि. बुलडाणा संचलीत कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर, जि. बुलढाणा

Principal
Arts & Sci.Mahila Mahavidyalaya
Mehkar,Dist.Buldana